**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.– १३२/२०२४**
**प्रयागबाई वानखेडे वि. प्रयागबाई वानखेडे**

## निशाणी–१९ खाली आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला, दि. ०९.०१.२०२५ रोजीचा विना लेखी जवाब नाहीचा, आदेश बाजुस सारुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.१ चे असे कथन आहे की, ते रत्नागिरी येथे पोट भरणेसाठी गेले असल्यामुळे व दाव्यासंबंधी काही महत्वाची कागदपत्रे मिळण्यास उशीर झाल्याने, प्रतिवादी क्र.१ यांना विहित मुदतीत लेखी जबाब दाखल करणे शक्य झाले नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** प्रतिवादी क्र.१ ने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. अर्जात कुठलेही संयुक्तीक कारण कागदपत्रसोबत पटलावर दाखल केलेले नाही. तसेच लेखी म्हणणे नाहीचा आदेश होवून सतरा महिने झालेले आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादीने केली.

**०४.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र.१ विरुध्द विना लेखी जबाब हा आदेश दि.०९.०१.२०२५ रोजी पारित केलेला आहे. तदनंतर दि.०२.०२.२०२५ रोजी म्हणजेच २३ दिवसांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमुद केलेल्या कारणाच्या पृष्टयर्थ कोणतेही कागदपत्र पटलावर नाही. तसेच नेमके असे कोणते महत्वाचे कागदपत्र दाखल करावयाचे होते, या विषयी देखील स्पष्ट उल्लेख अर्जात नाही. मात्र, लेखी जबाब पटलावर न घेतल्यास दाव्याचा निर्णय गुणांवर होणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.१ चा लेखी जबाब पटलावर असणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज रक्कम रुपये २००/– च्या कॉस्टवर मंजुर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला विना लेखी जबाब नाही, हा आदेश बाजुस सारण्यात येतो.

**०३.** सदर कॉस्ट प्रतिवादी क्र.१ ने वादी यांना द्यावी.

**स्वाक्षरीत/–**

[ए.एच.तट्टु]

३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,

सिल्लोड.

**<u>दिनांक</u> :– २३.०७.२०२५.**